पोलीस अधीक्षक कार्यालय,धाराशिव.
'नियमित जनसंपर्क'विभाग,
दुरध्वनी क्रंमाक-8007269000
ईमेल नं.-jansampark.osd@gmail.com

'नियमित प्रसिध्दी पत्रक'(प्रेस नोट)' सोमवार' दि.26.10.2026

धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.25 ऑक्टोंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण 169 कारवाया करुन 1,68,500 ₹'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

" अवैध मद्य विरोधी कारवाई."

भुम पोलीस ठाणे: आरोपी नामे-महादेव भानुदास ठोंबरे, वय 65 वर्षे, रा.भवानवाडी टे ता.भुम जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 12.30 वा. सु.प्रतिक किराणा दुकानासमोर भवानवाडी टें येथे अंदाजे 1,000 ₹ किंमतीची 10 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-चंदा महादेव काळे, वय 19 वर्षे, रा. कल्याणनगर भुम ता.भुम जि. धाराशिव यांचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 17.45 वा. सु.बसस्थानक भुम चे पाठीमागे मोकळ्या जागेत अंदाजे 1,500 ₹ किंमतीची 15 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-जनाबाई भागवत पवार, वय 53 वर्षे, रा. कल्याणनगर भुम ता.भुम जि. धाराशिव यांचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 18.00 वा. सु.भुम बसस्थानकाचे पाठीमागे मोकळ्या जागेत अंदाजे 1,000 ₹ किंमतीची 10 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-ताई अंकुश पवार, वय 45 वर्षे, रा. इंदीरानगर भुम ता.भुम जि. धाराशिव यांचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 16.00 वा. सु.कुसुमनगर भुम येथील वाहनतळाचे बाजूला मोकळ्या जागेत अंदाजे 1,500 ₹ किंमतीची 15 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-मंगल बबन काळे, वय 46 वर्षे, रा. पारधी पिढी भुम ता.भुम जि. धाराशिव यांचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 17.15 वा. सु.आठवडी बाजार भुम येथे मोकळ्या जागेत अंदाजे 1,500 ₹ किंमतीची 15 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-दयानंद सिध्देश्वर लवटे, वय 22 वर्षे, रा. डुक्करवाडी ता. भुम जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 14.00 वा. सु.भुम ते ईट रोडलगत भवानवाडी शिवारात असलेले मैत्री हॉटेलच्या समोर मोकळ्या जागेत अंदाजे 1,100 ₹ किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या 11 सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये भुम पो ठाणे येथे स्वतंत्र 6 गुन्हे नोंदविले आहेत.

ढोकी पोलीस ठाणे: आरोपी नामे-अनिल संतराम चव्हाण, रा. तावरजखेडा ता. जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 09.35 वा. सु.आपल्या राहत्या घराचे बाजूला तावरजखेडा येथे अंदाजे 10,000 ₹ किंमतीची 100 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-राजेंद्र खेमा राठोड, रा. तावरजखेडा ता. जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 10.50 वा. सु.आपल्या राहत्या घराचे बाजूला तावरजखेडा येथे अंदाजे 52,000 ₹ किंमतीची 520 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-दत्ता गंगाराम जाधव, रा. तावरजखेडा ता. जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 08.40 वा. सु.आपल्या राहत्या घराचे बाजूला तावरजखेडा येथे अंदाजे 5,000 ₹ किंमतीची 50 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-सुरेश प्रभु पवार, वय 54 वर्षे, रा. किणी ता. जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 16.00 वा. सु.किणी वस्तीवरील कृषी लॉजच्या कंपाउंड भिंतीजवळ पत्र्याचे शेडजवळ अंदाजे 1,200 ₹ किंमतीची 12 लिटर गावठी दारु अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. तर आरोपी नामे-विष्णु जालींदर मोरे, वय 54 वर्षे, रा. हिंगळजवाडी ता. जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 17.30 वा.

सु.हिंगळजवाडी ते धाराशिव जाणारे रोडलगत जिव्हाळा हॉटेल जवळ अंदाजे 2,125 ₹ किंमतीच्या देशी विदेशी दारुच्या 26 सिलबंद बाटल्या अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेल्या जप्त करण्यात आल्या. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये ढोकी पो ठाणे येथे स्वतंत्र 5 गुन्हे नोंदविले आहेत.

वाशी पोलीस ठाणे: आरोपी नामे-अनिल भिमराव शिंदे, वय 52 वर्षे, रा. मांडवा ता. वाशी जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 10.50 वा. सु. मांडवा पारधी पिडी आपल्या राहत्या घराचे पत्र्याचे शेडसमोर अंदाजे 1,600 ₹ किंमतीची 15 लिटर गावठी दारु साहित्या सह अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये वाशी पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

उमरगा पोलीस ठाणे: आरोपी नामे-सुरेश रंगराव दिवटे, वय 50 वर्षे, रा. हिप्परगा राव ता. उमरगा जि. धाराशिव याचे कब्जातुन दि.25.10.2026 रोजी 11.15 वा. सु. हिप्परगा राव ग्रामपंचायत समोर झाडाखाली अंदाजे 3,000 ₹ किंमतीची 28 लिटर गावठी दारु साहित्या सह अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेली जप्त करण्यात आली. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-65(ई) अन्वये उमरगा पो ठाणे येथे गुन्हा नोंदविला आहे.

" जुगार विरोधी कारवाई."

तुळजापूर पोलीस ठाणे :जुगार विरोधी कारवाई दरम्यान तुळजापूर पोलीसांनी दि.25.10.2026 रोजी 11.30 वा. सु. तुळजापूर पोलीस ठाणे हद्दीत सोलापूर ते तुळजापूर हायवे रोडजवळ सांगवी शिवार ए.के. बार पुढे तुळजापूर येथे छापा टाकला. यावेळी आरोपी नामे-विशाल रामकिसन शिंदे, रा. मांडवा ता. वाशी जि. धाराशिव, सिध्दाराम इरप्पा उटगी, वय 31 वर्षे, रा. हासुर ता. अपलपुर जि. कलबुर्गी हे 11.30 वा. सु. सोलापूर ते तुळजापूर हायवे रोडजवळ सांगवी शिवार ए.के. बार पुढे तुळजापूर येथे सुरट मटका जुगाराचे साहित्य सह मोबाईल फोन असा एकुण 1,640 रोख रक्कम स्वत:चे कब्जात बाळगलेले तुळजापूर पो. ठाणेच्या पथकास आढळले. यावरुन पोलीसांनी जुगार साहित्यासह रक्कम जप्त करुन नमूद व्यक्तींविरुध्द महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा कलम-12 (अ) अन्वये तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

"मद्यपी चालकावर गुन्हा दाखल."

तुळजापूर पोलीस ठाणे:आरोपी नामे-लक्ष्मण बंडू साठे, वय 23 वर्षे, रा. हासेगाव वाडी ता.औसा जि. लातुर हे दि.25.10.2026 रोजी 13.45 वा. सु. आपल्या ताब्यातील विना पासिंग मोटरसायकल ही एनएच 361 वर जय मल्हार हॉटेल समोर काक्रंबा हद्दीत मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-185 मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द तुळजापूर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

नळदुर्ग पोलीस ठाणे:आरोपी नामे-उपरी राकेश उपरी विठ्ठल, वय 23 वर्षे, रा. घर नं 1-23 कोनापुर सदाशिवपेठ जि. संगारेड्डी राज्य तेलंगणा हे दि.25.10.2026 रोजी 17.30 वा. सु. आपल्या ताब्यातील कार क्र ए.पी. 27 ए.टी. 2345 ही मुर्टा पाटील येथे मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-185 मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द नळदुर्ग पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

" मालमत्तेविरुध्द गुन्हे."

तुळजापूर पोलीस ठाणे :फिर्यादी नामे-अमरेंदर बिक्षापती चिंतला, वय 46 वर्षे, रा. 3-2-17/1-17 ए निंबोली अड्डा काचेगोडा ता. जि. हैद्राबाद राज्य तेलंगणा यांची अंदाजे 90,000₹किंमतीची 15 ग्रॅम वजनाची सोन्याची चैन आरोपी नामे- तेजस सुशील तुसांबड, रा. वतार भलभीमनगर ता. जि. बीड इतर एक इसम यांनी दि.25.10.2026 रोजी 13.19 वा. सु. मंदीराचे समोर तुळजापूर येथुन चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अमरेंदर चिंतला यांनी दि.25.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे तुळजापूर येथे भा.न्या.सं.कलम 303(2),3(5) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान फिर्यादीने दिलेल्या माहितीवरुन तुळजापूर पोलीसांनी आरोपी नामे-तेजस सुशील तुसांबड, रा. वतार भलभीमनगर ता. जि. बीड यास ताब्यात घेवून सदर गुन्ह्या बाबत चौकशी केली असता नमुद आरोपीने सरदचा गुन्हा केल्याची कबुली दिली. पुढील तपास सुरु आहे.

"मारहाण."

उमरगा पोलीस ठाणे :आरोपी नामे-राजेंद्र सिताराम फुगटे, रा. माडज ता. उमरगा जि. धाराशिव यांनी

दि.18.10.2026 रोजी 04.30 वा. सु छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे तळ्याजवळ फिर्यादी नामे-सिध्दार्थ बलभिम सुर्यवंशी, वय 32 वर्षे, रा. माडज ता. उमरगा जि. धाराशिव यांची आई व मामी यांना नमुद आरोपीने मोटरसायकल घेवून गेल्याचे कारणावरुन जातीवाचक शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, काठी व बेल्टने मारहाण करुन जखमी केले. तुम्हाला बघुन घेतो अशी धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सिध्दार्थ सुर्यवंशी यांनी दि.25.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे उमरगा येथे भा.न्या.सं.कलम 118(2), 118(1), 115(2), 352, 351(2)(3) सह अ.जा.ज.अ. प्र.अधि. कलम 3(1)(आर),3(1)(एस), 3)2)(व्हि) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

येरमाळा पोलीस ठाणे :आरोपी नामे- शाम उर्फ बापु प्रभु कोळी, रेणुका शाम उर्फ बापु कोळी, पार्वती प्रभु कोळी, सर्व रा. वाघोली ता. कळंब जि. धाराशिव यांनी दि.23.10.2026 रोजी 16.30 ते 16.45 वा. सु वाघोली येथे फिर्यादी नामे-संगीता अनंत सुतार, वय 41 वर्षे, रा. वाघोली ता. कळंब जि. धाराशिव यांचा भाउ प्रदीप सुतार व भावजई सिवता सुतार हे बौध्दीक दिव्यांगत्व असल्याचे माहित असताना देखील नमुद आरोपींनी सविता सुतार यांनी शिवीगाळ केल्याचे कारणावरुन शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, लोखंडी पट्टीने मारहाण करुन जखमी केले. फिर्यादीची आईस शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण करुन तुम्ही येथे कसे राहता असे म्हणून धमकी दिली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-संगीता सुतार यांनी दि.25.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे येरमाळा येथे भा.न्या.सं.कलम 118(1), 115(2), 351(2), 3(5) सह कलम 92 (ए),(बी) अंपग व्यक्ती अधिकारी अधिनियम अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

तुळजापूर पोलीस ठाणे :आरोपी नामे- हरिप्रिया एक्झीकेटिव्ह लॉजचे मॅनेजर व लॉज ओनर व इतर 7 ते 8 सर्व रा. तुळजापूर ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.25.10.2026 रोजी 00.15 वा. सु हरिप्रिया एक्झीकेटिव्ह लॉज येथे फिर्यादी नामे-सन्नी सुंदर चव्हाण, वय 38 वर्षे, रा.के.बी. कॉलनी गुलबर्गा ता. जि. गुलबर्गा राज्य कर्नाटक यांना नमुद आरोपींनी आर्थिक व्यवहाराचे कारणावरुन गैरकायद्याची मंडळी जमवून शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी, लोखंडी रॉडने मारहाण करुन जखमी केले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सन्नी चव्हाण यांनी दि.25.10.2026 रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन पो. ठाणे तुळजापूर येथे भा.न्या.सं.कलम 118(1), 189, 190, 191, 115(2), 352अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

जनसंपर्क विभाग धाराशिव पोलीस